

वॉटसन गुडमन संकलित

धार्मिकतेची भूक व तहान लागलेल्यांना, पवित्र शास्त्रातील देवाची वचने सहाय्यभूत होतात. मनुष्य आपली पापे सोडून पश्चात्ताप करतो व प्रभू येशू ख्रिस्त या तारकावर अंत:करणपूर्वक विश्वास ठेवतो तेव्हा प्रभू स्वत: त्याला दर्शन देतो व विश्वासणाऱ्याच्या अंत:करणाला त्याचा आनंद व शांती देतो. अशा आनंददायी शांतीचा मी स्वत: १९३७ मध्ये अनुभव घेतला आणि तेव्हापासून मी प्रभूच्या आनंद-दायी सहवासाला खंड पडू दिला नाही. तुम्हांलाही अशा शांतिदायक आनंदाचा लाभ व्हावा अशी इच्छा असल्यास तुम्ही त्याला आता शरण जा व आपले जीवन समर्पण करा.

— बॉटसन गुडमन

# देवाची प्रीती



रोम ५:८

परंतु देव आपल्यावरच्या स्वप्रेमाचे प्रमाण हे देतो की आपण पापी असता ख्रिस्त आपणांसाठी मरण पावला.

प्रकटी १:५

आणि विश्वासू साक्षी, मेलेल्यांमधून 'प्रथम जन्मलेल्या' व पृथ्वीवरील राजांचा अधिपती येशू ख्रिस्त याजपासून . . जो आपल्यावर प्रीती करितो, ज्याने स्वरुधिराने तुम्हांआम्हांला आपल्या पातकांपासून मुक्त केले.

योहान ३:१६

देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, यासाठी की जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.

# येशू ख्रिस्ताचे देवपण

१ तीमथ्य ३:१६

सुभक्तीचे गूज निर्विवाद मोठे आहे : तो देहाने प्रकट झाला, आत्म्याने नीतिमान ठरला, देवदूतांच्या दृष्टीस पडला, त्याची राष्ट्रांत घोषणा झाली, जगात त्याजवर विश्वास ठेवण्यात आला, तो गौरवात वर घेतला गेला.

मत्तय १:२२,२३

हे सर्व यासाठी झाले की प्रभूने संदेष्टयाच्या द्वारे जे सांगितले होते ते पूर्ण व्हावे; ते असे की, पाहा, कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल व त्याला इम्मानुएल म्हणतील; या नावाचा अर्थ, ‘आम्हांबरोबर देव’ असा आहे.

# देवाचा पुत्र येशू

१ योहान ४:१५

येशू देवाचा पुत्र आहे, असे जो कोणी कबूल करितो त्याच्या ठायी देव राहतो व तो देवाच्या ठायी राहतो.

कलस्सै २:९

कारण (येशू) ख्रिस्ताच्या ठायीच देवपणाची सर्व पूर्णता मूर्तिमान वसते.

यशया ९:६

कारण आम्हांसाठी बाल जन्मला आहे, आम्हांस पुत्र दिला आहे; त्याच्या खांद्यांवर सत्ता राहील; त्याला अद्भुत मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपती म्हणतील.

# येशूने स्वतः मी कोण आहे हे सांगितले

## योहान ६:३५, ३६

येशूने त्यांस म्हटले, जीवनाची भाकर मी आहे; जो मजकडे येतो त्याला भूक लागणार नाही आणि जो मजवर विश्वास ठेवितो त्याला कधीही तहान लागणार नाही.

## योहान ८:५८

येशूने त्यांस म्हटले, मी तुम्हांस खचीत खचीत सांगतो, अब्राहाम झाला त्यापूर्वी मी आहे.

## योहान ११:२५

येशूने तिला म्हटले, पुनरुत्थान व जीवन मीच आहे; जो मजवर विश्वास ठेवितो तो मेला असला तरी जगेल.

# येशूने केलेले काही चमत्कार

लूक ५:४-६

आपले बोलणे संपविल्यावर त्याने शिमोनाला म्हटले, खोल पाण्यात जाऊ द्या व मासे धरण्यासाठी आपली जाळी खाली सोडा. शिमोनाने त्याला उत्तर दिले, गुरुजी, आम्ही सारी रात्र कष्ट करून काही धरिले नाही, तरी आपल्या सांगण्यावरून मी जाळी सोडितो. मग त्यांनी तसे केल्यावर माशांचा मोठा घोळका जाळ्यात सापडला आणि त्यांची जाळी फाटू लागली.

मत्तय २० ३४

तेव्हा येशूला कळवळा येऊन त्याने त्यांच्या डोळ्यांस स्पर्श केला, तेव्हा त्यांस तत्काळ दिसू लागले, आणि ते त्याच्यामागे चालले.

# येशू ख्रिस्त हा उत्पन्नकर्ता व प्रभू आहे

कलस्सै १:१६

कारण आकाशात व पृथ्वीवर असलेले; दृश्य व अदृश्य असलेले; राजे, अधिपती, सत्ताधीश किंवा अधिकारी असलेले; ते सर्व त्याच्यामध्ये उत्पन्न झाले; सर्व त्याच्या द्वारे व त्याच्यासाठी झाले.

योहान १:३

त्याच्या द्वारे सर्व झाले; आणि झाले असे काहीच त्याजवाचून झाले नाही.

प्रेषित २:३६

यास्तव इस्राएलाच्या सर्व घराण्याने हे निश्चयपूर्वक समजून घ्यावे की ज्या येशूला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारिले त्याला देवाने प्रभू व ख्रिस्त असे करून ठेविले आहे.

## येशू ख्रिस्त हा सर्वांचा न्यायाधीश आहे



रोम १४:१०

तर तू आपल्या भावाला दोषी का ठरवितोस ? किंवा तू आपल्या भावाला तुच्छ का मानितोस ? आपण सर्व देवाच्या न्यायासनासमोर उभे राहावयाचे आहो.

प्रेषित १०:४२

त्याने आम्हांस आज्ञा केली की लोकांस उपदेश करा व साक्ष द्या की देवाने नेमलेला, जिवंतांचा व मेलेल्यांचा असा न्यायाधीश, हाच आहे.

योहान ५:२२

पिता कोणाचाही न्याय करीत नाही, तर सर्व न्याय करण्याचे काम त्याने पुत्राकडे सोपवून दिले आहे.

# उद्धार केवळ ख्रिस्ताद्वारे होतो

इब्री ७:२५

ह्यामुळे याच्या द्वारे देवाजवळ जाणाऱ्यांस हा पूर्णपणे तारण्यास समर्थ आहे; कारण त्यांच्यासाठी मध्यस्थी करण्यास हा सर्वदा जिवंत आहे.

योहान १४:६

येशूने त्याला म्हटले, मार्ग, सत्य, व जीवन मीच आहे; माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याजवळ कोणी जात नाही.

प्रेषित ४:१२

तारण दुसऱ्या कोणाकडून नाही; जेणेकरून आपले तारण व्हावयाचे असे दुसरे नाम आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही.

# उद्धार केवळ ख्रिस्ताद्वारे होतो

तीत २:१४

त्याने स्वतःला आपल्याकरिता दिले, यासाठी की 'त्याने खंडणी देऊन आपल्याला सर्व अधर्मापासून मुक्त करावे,' आणि चांगल्या कामात तत्पर करून आपले 'स्वतःचे लोक असे आपणासाठी शुद्ध करून ठेवावे.'

कलस्सै १:१२–१४

ज्याने आपल्याला प्रकाशातील पवित्र जनांच्या वतनाचे विभागी होण्याजोगे केले त्या पित्याचे उपकारस्मरण करावे. त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेविले; त्या पुत्राच्या ठायी आपल्याला मुक्ती म्हणजे आपल्या पापांची क्षमा प्राप्त झाली आहे.

# ख्रिस्ताचे रक्त हेच प्रायश्चित

इफिस १:७

त्याच्या कृपेच्या विपुलतेप्रमाणे त्या प्रियकरात त्याच्या रक्ताच्या द्वारे आपल्याला मुक्ती म्हणजे आपल्या अपराधांची क्षमा मिळाली आहे.

१ योहान १:७

पण जसा तो प्रकाशात आहे तसे जर आपण प्रकाशात चालतो, तर आपली एकमेकांबरोबर भागी आहे; आणि त्याचा पुत्र येशू याचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करिते.

इब्री ९:१४

सार्वकालिक आत्म्याच्या योगे ज्याने निष्कलंक अशा स्वतःस देवाला अर्पण केले त्या ख्रिस्ताचे रक्त, तुमचा विवेकभाव जिवंत देवाच्या सेवेसाठी निर्जीव कर्मांपासून किती विशेषेकरून शुद्ध करील?

# ख्रिस्तावरील विश्वासाद्वारे तारण

१ योहान ५:४

कारण जे काही देवापासून जन्मलेले आहे ते जगावर जय मिळविते; आणि ज्याने जगावर जय मिळविला तो हाच आपला विश्वास आहे.

इफिस २:८, ९

तुमचे तारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे झाले आहे, आणि हे तुमच्या हातून झाले नाही, तर हे देवाचे दान आहे; कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही.

योहान ६:२८,२९

यावरून त्यांनी त्याला म्हटले, देवाची कामे आमच्या हातून व्हावी म्हणून आम्ही काय करावे? येशूने त्यांस उत्तर दिले, देवाचे काम हेच आहे की ज्याला त्याने पाठविले त्याजवर तुम्ही विश्वास ठेवावा.

# देवाची दया

तीत ३:५

आपण केलेल्या नीतीच्या कर्मांनी नव्हे, तर नव्या जन्माचे स्नान व पवित्र आत्म्याने केलेले नवीकरण यांच्या द्वारे त्याने आपल्या दये-नुसार आपल्याला तारिले.

स्तोत्र १०३ : ११

कारण जसे पृथ्वीच्यावर आकाश फार उंच आहे, तशी त्याची दया त्याचे भय धरणाऱ्यांवर विपुल आहे.

स्तोत्र १०३:१७

परंतु परमेश्वराची दया त्याचे भय धरणाऱ्यांवर युगानुयुग असते, आणि त्याच्या न्याय्यत्वाचा अनुभव त्यांच्या पुत्रपौत्रांस घडतो.

# देव आम्हांला आपल्याकडे बोलावतो 

मत्तय ११:२८

अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व मजकडे या, म्हणजे मी तुम्हांला विश्रांती देईन.

प्रकटी २२:१७

आत्मा व वधू ही म्हणतात, ये. ऐकणाराही म्हणो, ये. तान्हेला 'येवो'; आणि ज्याला पाहिजे तो जीवनी पाणी फुकट घेवो.

यशाया १:१८

परमेश्वर म्हणतो, चला, या, आपण बुद्धिवाद करूं; तुमची पातकें लाखेसारखी लाल असली तरी ती बर्फासारखी पांढरी होतील; ती किरमिजासारखी तांबडी असली तरी लोकरीसारखी निघतील.

# सर्व लोक देवाची लेकरे नाहीत

१ योहान ३:१०

यावरून देवाची मुले व सैतानाची मुले उघड होतात. जो कोणी नीतीने वागत नाही तो देवापासून नाही व जो आपल्या बंधूवर प्रीती करीत नाही तोही नाही.

रोम ८:१४,१५

जितक्यांस देवाचा आत्मा चालवितो ते देवपुत्र आहेत; कारण पुनः भीती बाळगावी असा दासपणाचा आत्मा तुम्हांस मिळाला नाही; तर ज्याच्या योगे आपण अब्बा, बापा, अशी हाक मारितो असा दत्तकपणाचा आत्मा मिळाला आहे.

योहान १:१२

जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांस, म्हणजे त्याच्या नामावर विश्वास ठेवणाऱ्यांस, त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला.

गलती ५:१९–२१

देहाची कर्मे तर उघड आहेत; ती ही : जारकर्म, अशुद्धपणा, कामातुरपणा, मूर्तिपूजा, चेटके, वैर, कलह, मत्सर, राग, तट, फुटी, पक्षभेद, हेवा, दारूबाजी, रंगेलपणा आणि अशा इतर गोष्टी; यांविषयी जे मी पूर्वी तुम्हांस सांगून ठेविले होते तेच आता सांगून ठेवतो की अशी कर्मे करणाऱ्यांना देवाच्या राज्याचे वतन मिळणार नाही.

यशया ५:११

जे पहाटेस उठून मद्याच्या पाठीस लागतात, जे अपरात्रपर्यंत द्राक्षारस पिऊन धुंद होतात त्यांस धिक्कार असो !

# ख्रिस्त अंतःकरणाला आनंदवितो

गलती २:२०

मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभाला खिळिलेला आहे; आणि मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते विश्वासाने आहे, ज्या देवाच्या पुत्राने मजवर प्रीती केली व स्वतःला मजकरिता दिले त्याजवरील विश्वासाने ते आहे.

योहान १५:११

माझा आनंद तुम्हांमध्ये असावा व तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा म्हणून मी तुम्हांस या गोष्टी सांगितल्या आहेत.

स्तोत्र १६:११

जीवनाचा मार्ग तू मला दाखविशील, तुझ्या सान्निध्यात पूर्णानंद आहे; तुझ्या उजव्या हातात सौख्ये सदोदित आहेत.

द्रव्यांस दे म्हणजे तुला स्वर्गात संपत्ती मिळेल; चल, माझ्या मागे ये; परंतु तो हे वचन ऐकून म्लानमुख झाला व कष्टी होऊन निघून गेला; कारण तो फार श्रीमान होता.



## फसू नका

इफिस ५:६

पोकळ भाषणाने कोणी तुम्हांस फसवू नये; कारण अशा पापांमुळे आज्ञाभंग करणाऱ्या पुत्रांवर देवाचा कोप होतो.

१ करिंथ ६:९,१०

अनीतिमान मनुष्याला देवाच्या राज्याचे वतन मिळणार नाही हे तुम्हांस ठाऊक नाही काय? फसू नका; जारकर्मी, मूर्तिपूजक, व्यभिचारी, चैनबाज, पुंमैथुनकारी, चोर, लोभी, मद्यपी, चहाड व वित्त हरण करणारे यांस देवाच्या राज्याचे वतन मिळणार नाही.

# पापामुळे मरण येते

रोम ५:१२

ह्या प्रकारे एका मनुष्याच्या द्वारे पाप जगात आले आणि पापाच्या द्वारे मरण आले; आणि सर्वांनी पाप केल्यावरून सर्व मनुष्यांत मरण पसरले.

याकोब १:१५

मग वासना गर्भवती होऊन पापाला जन्म देते; आणि पाप परिपक्व झाल्यावर मरणास उपजविते.

लूक १५:३२

उत्साह व आनंद करणे हे योग्य आहे; कारण हा तुझा भाऊ मेला होता, तो जिवंत झाला आहे; हरवला होता तो सापडला आहे.

# ख्रिस्ताने मृत्यूला जिंकिले

प्रकटी १:१८

मी मेलो होतो तरी पाहा, युगानुयुग जिवंत आहे, आणि मरणाच्या व अधोलोकाच्या किल्ल्या मजजवळ आहेत.

योहान ११:४३,४४

असे बोलून त्याने मोठ्याने हाक मारून म्हटले, लाजरा, बाहेर ये. तेव्हा मृत झालेला तो इसम बाहेर आला; त्याचे हातपाय प्रेत-वस्त्रांनी बांधिलेले व तोंड रुमालाने वेष्टिलेले होते. येशूने त्यास म्हटले, ह्याला मोकळे करून जाऊ द्या.

# देवाच्या आज्ञा

अनुवाद ५:७-२१

माझ्यासमोर तुला अन्य देव नसावे. आपल्यासाठी कोरीव मूर्ती करू नको; आकाशातील, खाली पृथ्वीवरील व पृथ्वीखालच्या जलांतील कशाचीही प्रतिमा करू नको; त्यांच्या पाया पडू नको किंवा त्यांची पूजा करू नको.....

तुझा देव परमेश्वर याचे नाव व्यर्थ घेऊ नको; जो परमेश्वराचे नाम व्यर्थ घेईल त्याची तो गय करणार नाही.

तुझा देव परमेश्वर याने तुला आज्ञा केल्याप्रमाणे शब्बाथ दिवस पवित्रपणे पाळण्याकडे लक्ष असू दे; सहा दिवस श्रम करून आपले सर्व कामकाज कर; पण सातवा दिवस तुझा देव परमेश्वर याचा शब्बाथ आहे.

तुझा देव परमेश्वर याने तुला आज्ञा केली आहे तदनुसार आपला बाप व आपली आई यांचा मान राख.

खून करू नको.

व्यभिचार करू नको.

चोरी करू नको.

आपल्या शेजाऱ्याविरुद्ध खोटी साक्ष देऊ नको.

आपल्या शेजाऱ्याच्या स्त्रीचा अभिलाष करू नको, आपल्या शेजाऱ्याच्या घराची लालसा धरू नको; त्याचे शेत, दास, दासी, बैल, गाढव, अथवा आपल्या शेजाऱ्याची कोणतीही वस्तू यांची लालसा धरू नको.

# तुम्हांला देवापासून लपविता येणार नाही

नीतिसूत्रे १५:३

परमेश्वराचे नेत्र सर्वत्र आहेत, ते बरेवाईट पाहत असतात.

ईयोब ३४:२१,२२

कारण देवाची दृष्टी प्रत्येकाच्या आचरणावर असते; त्याचे प्रत्येक पाऊल तो पाहतो. अधर्मी ज्यात लपून राहतील असा काळोख, असा घोर अंधकार नाही.

लूक ८:१७

प्रगट होणार नाही असे काही गुप्त नाही आणि कळणार नाही व उघडकीस येणार नाही असे काही झाकलेले नाही.

# अधार्मिकांना अनंतकाळ मिळणारी शिक्षा

स्तोत्र ९:१७

देवाला विसरणारी सर्व राष्ट्रे म्हणजे दुर्जन अधोलोकात परत जातील.

मत्तय २५:४६

'ते तर सार्वकालिक' दंड भोगावयास जातील; आणि धार्मिक लोक 'सार्वकालिक जीवन भोगावयास' जातील.

मत्तय १३:४१,४२

मनुष्याचा पुत्र आपल्या देवदूतांस पाठवील, आणि ते सर्व 'अडखळविणाऱ्यांस व अधर्म करणाऱ्यांस' त्याच्या राज्यातून जमा करून त्यांस अग्नीच्या भट्टीत टाकितील; तेथे रडणे व दातखाणे चालेल.

# पुढे न्याय होणार

प्रेषित १७:३१

त्याने असा एक दिवस नेमस्त केला आहे की त्या दिवशी आपण नेमिलेल्या मनुष्याच्या द्वारे तो जगाचा न्यायनिवाडा नीतिमत्वाने करील; त्याने त्याला मेलेल्यामधून उठवून याविषयींचे प्रमाण सर्वांस पटविले आहे.

रोम १४:१२

तर मग आपणांतील प्रत्येक जण स्वतःचा हिशेब देवाला देईल.

१ योहान ४:१७

न्यायाच्या दिवसासंबंधाने आपल्या ठायी धैर्य उत्पन्न व्हावे म्हणून त्याची प्रीती आपल्यामध्ये अशी पूर्ण झाली आहे; कारण जसा तो आहे तसे या जगात आपणही आहो.

# येशू ख्रिस्ताची कृपा



२ करिंथ ८:९

आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हांला माहीत आहे; तो धनवान असता तुम्हांकरिता दरिद्री झाला, यासाठी की त्याच्या दारिद्र्याने तुम्ही धनवान व्हावे.

१ पेत्र ५:५ ब

'देव गर्विष्ठांचा विरोध करितो, आणि लीनांवर कृपा करितो'.

रोम ९:१६

हे तर इच्छा बाळगणाऱ्याकडे नाही व धावणाऱ्याकडेही नाही, तर दया करणारा देव याजकडे आहे.

# पश्चात्ताप

प्रेषित ३:१९

यास्तव तुमची पापे पुसून टाकिली जावी म्हणून पश्चात्ताप करा व मागे वळा, अशासाठी की विश्रांती मिळण्याचे समय प्रभू-जवळून यावे.

लूक १३:३

मी तुम्हांस सांगतो, नव्हते; तरी पण तुम्ही पश्चात्ताप न केल्यास सर्व त्याप्रमाणे नाश पावाल.

मत्तय ३:२

पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे.

प्रेषित १७:३०

अज्ञानाच्या काळाची देवाने उपेक्षा केली, परंतु आता सर्वांनी सर्वत्र पश्चात्ताप करावा अशी तो मनुष्यांस आज्ञा करितो.

# पापांची क्षमा

मत्तय ६:१४

जर तुम्ही मनुष्यांच्या अपराधांची क्षमा करिता तर तुमचा स्वर्गीय पिता तुम्हांस क्षमा करील.

प्रकटी ३:२०

पाहा, मी दाराजवळ उभा आहे व ठोकीत आहे; जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याजवळ आत जाईन व त्याजबरोबर जेवीन, आणि तो मजबरोबर जेवील.

यशया ५५:७

दुर्जन आपला मार्ग सोडो, अधर्मी आपल्या कल्पनांचा त्याग करो आणि परमेश्वराकडे वळो म्हणजे तो त्याजवर दया करील; तो आमच्या देवाकडे वळो, कारण तो त्याला भरपूर क्षमा करील.

# ऐहिक गोष्टींपासून अलिप्त राहणे

१ योहान २:१५;१६

जगावर व जगातल्या गोष्टींवर प्रीती करू नका; जर कोणी जगावर प्रीती करितो तर त्याच्या ठायी पित्याची प्रीती नाही. कारण जगात जे सर्व आहे ते, म्हणजे देहाची वासना, डोळ्यांची वासना व संसाराची फुशारकी, ही पित्यापासून नाहीत, तर जगापासून आहेत.

इफिस ५:११

अंधाराच्या निष्फळ कर्मांचे भागीदार होऊ नका, इतकेच नव्हे, तर त्यांचा प्रतिकार करा.

कलस्सै ३:२

वरील गोष्टींकडे मन लावा, पृथ्वीवरील गोष्टींकडे लावू नका.

१ पेत्र १:२३

तुम्ही नाशवंत बीजापासून नव्हे, तर अविनाशी बीजापासून म्हणजे ' देवाच्या सदाजीवी व टिकणाऱ्या ', वचनाच्या द्वारे पुनः जन्मविलेले आहा.

१ योहान ५:१८

जो कोणी देवापासून जन्मला आहे तो पाप करीत नाही, हे आपल्याला माहीत आहे; जो देवापासून जन्मला तो त्याला राखितो आणि तो दुष्ट त्याला शिवत नाही.

योहान ३:३

येशूने त्याला म्हटले, मी तुला खचीत खचीत सांगतो, नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही.

# पापास मेलेले पण ख्रिस्तामध्ये जिवंत

कलस्सै ३:१

यास्तव तुम्ही ख्रिस्ताबरोबर जर उठविले गेला, तर ख्रिस्त देवाच्या उजवीकडे जेथे बसला आहे तेथल्या वरील गोष्टी मिळवा-वयाचा यत्न करा.

गलती ५:२४

जे ख्रिस्त येशूचे आहेत त्यांनी दुर्वृत्ती व वासना यांसुद्धा देहाला वधस्तंभावर खिळिले आहे.

रोम ६:२ व ११

जे आपण पापाला मेलो त्या आपण यापुढे त्यात राहावे हे कसे ? ..तसे तुम्हीही स्वतःस पापाला मेलेले आणि ख्रिस्त येशूमध्ये देवाला जिवंत झालेले, असे माना.

# सार्वकालिक जीवन

रोम ६:२३

पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सर्वकाळचे जीवन आहे.

योहान ५ : २४

मी तुम्हांस खचीत खचीत सांगतो, जो माझे वचन ऐकतो आणि ज्याने मला पाठविले त्याजवर विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे; आणि त्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही, तो मरणातून जीवनात पार गेला आहे.

योहान १७:३

सार्वकालिक जीवन हेच आहे की त्यांनी, जो तू एकच सत्य देव त्या तुला, व ज्याला तू पाठविले, त्या येशू ख्रिस्ताला ओळखावे.

# तारणाची खात्री

योहान १४:२१

ज्याच्याजवळ माझ्या आज्ञा आहेत, व त्या जो पाळतो तोच मजवर प्रीती करणारा आहे; आणि जो मजवर प्रीती करितो त्याजवर माझा पिता प्रीती करील; मीही त्याजवर प्रीती करीन व स्वतः त्याला व्यक्त होईन.

यशया ३२:१७

नीतिमत्तेचा परिणाम शांती व तिचे फळ सर्वकाळचे स्वास्थ्य व निर्भयता होईल.

१ योहान ३:१८,१९,२०

मुलांनो, आपल्या शब्दांनी किंवा जिव्हेने नव्हे, तर कृतीने व सत्याने आपण प्रीती करावी. आपण सत्याचे आहो हे यावरून आपल्याला समजेल: ..आपण स्वतःच्या मनाला त्याजसमोर उमेद देऊ.

# मनाची प्रामाणिक ओढ पुरेशी नाही



मार्क १०:१७–२२

मग तो निघून वाटेस लागणार तो एकाने धावत येऊन व त्याच्यापुढे गुडघे टेकून त्याला विचारले, उत्तम गुरुजी, सार्वकालिक जीवन हे वतन मिळविण्यास मी काय करावे ? येशू त्याला म्हणाला, मला उत्तम का म्हणतोस ? एक म्हणजे देव, त्याजवाचून कोणी उत्तम नाही. आज्ञा तुला ठाऊक आहेत; 'मनुष्यहत्या करू नको, व्यभिचार करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको, ठकवू नको, आपला बाप व आपली आई यांचा मान राख.' त्याने उत्तर दिले, गुरुजी, मी आपल्या लहानपणापासून हे सर्व पाळिले आहे. येशूने त्याजकडे न्याहाळून पाहून त्याजवर प्रीती केली, व त्याला म्हटले, एक गोष्ट तुझ्यात उणी आहे; जा, तुझे आहे नाही ते विकून दरि-

# प्रभूचे आज्ञापालन आवश्यक

२ थेस्सल १:७–१०

ते, प्रभू येशू आपल्या सामर्थ्याच्या दूतांसह स्वर्गातून ‘ अग्निज्वालावेष्ठित ’ असा प्रकट होण्याच्या समयी होईल; तेव्हा ‘ जे देवाला ओळखत नाहीत ’ व आपल्या प्रभू येशूची सुवार्ता ‘ मानीत नाहीत त्यांचा तो सूड उगवील ’... तेव्हा ते ‘ प्रभूच्या समोरून व त्याच्या सामर्थ्याच्या गौरवापासून ’ दूर होऊन युगानुयुगाचा नाश हा दंड त्यांना मिळेल.

रोम ६:१६

आज्ञापालनाकरिता ज्याला तुम्ही स्वतःस दास असे समर्पण करिता, ज्याची आज्ञा तुम्ही मानिता, त्याचे दास तुम्ही आहा; ज्यांचा परिणाम मरण असे पापाचे दास, किंवा ज्यांचा परिणाम नीतिमत्त्व असे आज्ञापालनाचे दास तुम्ही आहा, हे तुम्हांस ठाऊक नाही काय ?

# ख्रिस्ताचा स्वीकार कबूल करणे आवश्यक 

रोम १०:९,१०

जर तू आपल्या मुखाने येशू प्रभू आहे असे स्वीकारिशील, आणि देवाने त्याला मेलेल्यातून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास धरशील तर तुला तारणप्राप्ती होईल. नीतिमत्त्वासाठी विश्वास धरणे अंतःकरणाने होते, तारणाचा स्वीकार करणे तोंडाने होते.

मत्तय १०:३२,३३

जो कोणी मनुष्यांसमोर मला स्वीकारील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर स्वीकारीन; पण जो कोणी मनुष्यांसमोर मला नाकारील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर नाकारीन.

# सैतान हा आपला मुख्य शत्रू

१ पेत्र ५:८

सावध असा, जागे राहा; तुमचा शत्रू सैतान हा गर्जणाऱ्या सिंहा-सारखा कोणाला गिळावे हे शोधीत फिरतो.

मत्तय ४:१,१०,११

तेव्हा सैतानाकडून येशूची परीक्षा व्हावी म्हणून आत्म्याने त्याला रानात नेले...तेव्हा येशू त्याला म्हणाला, अरे सैताना, निघून जा, कारण प्रभू तुझा देव याला नमन कर, व केवळ त्याचीच उपासना कर, असे लिहिले आहे. मग सैतान त्याला सोडून गेला; आणि पाहा, देवदूतांनी येऊन त्याची सेवा केली.

# सैतानावर विजय

१ योहान ३:८

जो पाप करितो तो सैतानापासून आहे, कारण सैतान प्रारंभापासून पाप करीत आहे; सैतानाची कृत्ये नष्ट करावी यासाठीच देवाचा पुत्र प्रकट झाला.

२ थेस्सल २:८

मग ‘तो अधर्मी’ पुरुष प्रकट होईल, त्याला प्रभू येशू ‘आपल्या मुखातील श्वासाने मारून टाकील,’ आणि आपण येताच स्वदर्शनानेच त्याला नाहीसे करील.

याकोब ४:७,८अ

यास्तव देवाच्या अधीन व्हा; सैतानाविरुद्ध आडवे व्हा म्हणजे तो तुम्हांपासून पळेल. देवाजवळ या म्हणजे तो तुम्हांजवळ येईन.

# प्रीती ही शिष्यत्वाचे प्रमाण आहे

योहान १३:३५

तुमची एकमेकांवर प्रीती असली म्हणजे त्यावरून सर्व ओळखतील की तुम्ही माझे शिष्य आहा.

गलती ५:२२,२३अ

आत्म्याच्या प्रभावाने होणारी फलप्राप्ती प्रीती, आनंद, शांती, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन ही आहे.

१ योहान ४:२०

मी देवावर प्रीती करतो, असे म्हणून जो कोणी आपल्या बंधूचा द्वेष करितो तो लबाड आहे; कारण आपल्या बंधूला पाहिले असून त्याजवर जो प्रीती करत नाही त्याच्याने, न पाहिलेल्या देवावर प्रीती करवत नाही.

# येशू ख्रिस्ताचे पुनरुत्थान

रोम ४:२५

आपल्या प्रभू येशूला आपल्या अपराधांमुळे धरून देण्यात आले व आपण नीतिमान ठरावे म्हणून पुनः उठविण्यात आले.

योहान २०:२६–२८

मग आठ दिवसांनंतर त्याचे शिष्य पुनः आत असून त्यांच्याबरोबर थोमा होता. तेव्हा दारे बंद असता येशू आला व मध्ये उभा राहून म्हणाला, तुम्हांस शांती असो. नंतर त्याने थोमाला म्हटले, तू आपले बोट इकडे करून माझे हात पाहा, आणि आपला हात इकडे पुढे करून माझ्या कुशीत घाल; आणि विश्वासहीन असू नको, तर विश्वास धरणारा ऐस. थोमाने त्याला म्हटले, माझा प्रभू व माझा देव.

# पुनरुत्थान ही आमची गौरवी आशा

योहान ५:२५

मी तुम्हांस खचीत खचीत सांगतो, असा समय येत आहे, किंबहुना आता आला आहे की, त्यात मेलेले लोक देवाच्या पुत्राची वाणी ऐकतील; व जे ऐकतील ते जिवंत होतील.

रोम ६:४-५

तर मग आपण त्या मरणातील बाप्तिस्म्याने त्याजबरोबर पुरले गेलो; यासाठी की ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यांतून उठविला गेला त्याप्रमाणेच आपणही जीवनाच्या नाविन्यात वागणूक करावी. जर आपण त्याच्या मरणाच्या प्रतिरूपाने त्याच्या बरोबर संयुक्त झालो आहो, तर त्याच्या उठण्याच्याही प्रतिरूपाने त्याच्याबरोबर संयुक्त होऊ.

# प्रभूसाठी पवित्र

मत्तय ३:११

मी पाण्याने तुमचा बाप्तिस्मा पश्चात्तापासाठी करितो; परंतु जो माझ्यामागून येतो तो मजपेक्षा समर्थ आहे, त्याच्या वाहणा घेऊन चालावयास मी योग्य नाही; तो पवित्र आत्म्याने व अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करील.

लूक १:७४,७५

ती अशी की तुम्ही आपल्या शत्रूंच्या हातांतून सुटून माझ्यासमोर पवित्रतेने व धार्मिकतेने आयुष्यभर माझी सेवा निर्भयपणे कराल, असे मी करीन.

१ पेत्र १:१५

तर ज्याने तुम्हांस पाचारण केले तो जसा पवित्र आहे तसे तुम्हीही सर्व प्रकारच्या आचरणात पवित्र व्हा.

# आत्म्याने भरलेली माणसे

प्रेषित १:८

पवित्र आत्मा तुम्हांवर येईल तेव्हा तुम्हांस सामर्थ्य प्राप्त होईल . .तुम्ही माझे साक्षी व्हाल.

प्रेषित ४:३१

आणि त्यांनी प्रार्थना केल्यावर ज्या जागेमध्ये ते जमले होते ती कंपित झाली; आणि ते सर्व पवित्र आत्म्याने पूर्ण होऊन देवाचे वचन धैर्याने बोलू लागले.

रोम ८:९

परंतु जर देवाचा आत्मा तुम्हांमध्ये वास करितो तर तुम्ही देहाच्या अधीन नाही, आत्म्याच्या अधीन आहा. जर कोणाला ख्रिस्ताचा आत्मा नाही तर तो त्याचा नाही.

१ पेत्र ४:१२,१३

प्रिय बंधूनो, तुमच्या परीक्षणासाठी जे तीव्र संकट तुम्हांवर आले आहे त्यावरून आपणांस काही अपूर्व झाले असे वाटून त्याचे नवल मानू नका; ज्यापेक्षा तुम्ही ख्रिस्ताच्या दु:खाचे वाटेकरी झाला आहा त्यापेक्षा आनंद करा; म्हणजे त्याचे गौरव प्रकट होण्याच्या वेळेसही तुम्ही उल्लासाने आनंद करा.

यशया ६६:२

परमेश्वर म्हणतो, ह्या सर्व वस्तू माझ्याच हाताने बनलेल्या आहेत; त्या अशा प्रकारे झाल्या आहेत; पण जो दीन व भग्नहृदय आहे व माझी वचने ऐकून कंपायमान होतो, त्याजकडे मी पाहतो.

# परीक्षेत पडणाऱ्यांस आश्वासने

स्तोत्र ३४:१९

धार्मिकाला बहुत कष्ट होतात; तरी परमेश्वर त्या सर्वांतून त्याला सोडवितो.

रोम १६:२०

शांतीचा देव सैतानाला तुमच्या पायांखाली लवकर तुडवील.

१ करिंथ १०:१३

मनुष्यास सहन होते तिच्याशिवाय दुसरी परीक्षा तुम्हांवर गुदरली नाही; आणि देव विश्वासपात्र आहे, तो तुमची परीक्षा तुमच्या शक्तिपलीकडे होऊ देणार नाही, तर परीक्षेबरोबर तिच्यातून निभावण्याचा उपाय करील, असे की तुम्ही ती सहन करावयास समर्थ व्हावे.

# विजय मिळविणाऱ्यांस आश्वासने

प्रकटी ३:५

जो विजय मिळवितो तो अशा रीतीने शुभ्र वस्त्रे परिधान केलेला होईल; मी 'जीवनी पुस्तकातले' त्याचे नाव 'खोडणारच' नाही, आणि माझ्या पित्यासमोर व त्याच्या दूतांसमोर मी त्याचे नाव पत्करून घेईन.

प्रकटी ३:२१

जो विजय मिळवितो त्याला मी आपल्या राजासनावर आपल्याजवळ बसू देईन; मीही तसा विजय मिळवून आपल्या पित्याजवळ त्याच्या राजासनावर बसलो.

प्रकटी २१:७

जो कोणी विजय मिळवितो त्याला ह्या गोष्टी वारशाने मिळतील; 'मी त्याचा देव होईन, आणि तो माझा पुत्र होईल.'

मत्तय ५:३२

मी तर तुम्हांस सांगतो की जो कोणी आपली बायको व्यभिचाराच्या कारणावाचून टाकितो तो तिला व्यभिचारिणी करितो; आणि जो कोणी अशा टाकिलेल्या स्त्रीबरोबर लग्न करितो तो व्यभिचार करितो.

लूक १६:१८

जो कोणी आपली बायको टाकून दुसरीबरोबर लग्न करितो तो व्यभिचार करितो; आणि नवऱ्याने टाकिलेल्या बायकोबरोबर जो लग्न करितो तो व्यभिचार करितो.

मत्तय २४:३०

तेव्हा मनुष्याच्या पुत्राचे चिन्ह आकाशात दिसेल; मग 'पृथ्वीवरल्या सर्व जातीचे लोक शोक करतील;' ते 'मनुष्याच्या पुत्राला आकाशाच्या मेघांवर आरूढ होऊन' पराक्रमाने व मोठ्या वैभवाने 'येताना' पाहतील.

योहान १४:३

आणि मी जाऊन तुम्हांसाठी जागा तयार केली म्हणजे पुन येऊन तुम्हांस आपल्याजवळ घेईन; यासाठी की जेथे मी आहे तेथे तुम्हीही असावे.

प्रकटी ३:११

मी लवकर येतो; कोणी तुझा मुगुट घेऊ नये म्हणून जे तुझे आहे ते दृढ धरून राहा.

# ख्रिस्ताचे पुनरागमन

## मत्तय १६:२७

मनुष्याचा पुत्र आपल्या पित्याच्या गौरवाने आपल्या दिव्यदूतांसहित येईल, त्यासमयी 'तो प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या कामाप्रमाणे फळ देईल.'

## लूक १२:४०

तुम्हीही सिद्ध असा, कारण तुम्हांस वाटत नाही त्या घटकेस मनुष्याचा पुत्र येईल.

## १ योहान ३:२

प्रिय जनहो, आपण आता देवाची मुले आहो; आणि पुढे आपण काय होऊ हे अजून प्रकट झाले नाही; तरी आपल्याला हे माहीत आहे की तो प्रकट झाल्यास आपण त्याच्यासारखे होऊ, कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दिसेल.

स्तोत्र ११९:१०५

तुझे वचन माझ्या पावलांकरिता दिवा व माझ्या मार्गावर प्रकाश आहे.

लूक २१:३३

आकाश व पृथ्वी नाहीतशी होतील; परंतु माझी वचने नाहीतशी होणारच नाहीत.

स्तोत्र ११९:११

मी तुझ्याविरुद्ध पाप करू नये म्हणून मी आपल्या मनात तुझे वचन जपून ठेविले आहे.

२ तीमथ्य ३:१६

प्रत्येक ईश्वरप्रेरित शास्त्रलेख, सद्बोध, दोष दाखविणे, सुधारणूक, नीतिशिक्षण यांकरिता उपयोगी आहे.